महाराष्ट्र वन विभाग

महाराष्ट्र शासन

# उप वनसंरक्षक,अलिबाग यांचे कार्यालय,अलिबाग

म.पो.हिराकोट तलावाजवळ अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड पी.नं. 402 201

"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

दूरध्वनी क्र 02141-222016/222216 Email ID:dycfalibag@mahaforest.gov.in

जावक क्रमांक: ब/20/जमिन/वसं/ 6324 /2023-24. दिनांक: 31/ 01/2024.

प्रति,

जनरल मॅनेजर (पर्यावरण व वने),
सिडको भवन, सी.बी.डी.बेलापुर, नवी मुंबई.

विषयः- **एकरेषीय (Linear) प्रकल्पातर्गत वनक्षेत्रात कामे सुरु करणेस व झाडे तोडण्यास परवानगी (Working Permission) देण्याबाबत...**
प्रस्तावित उलवा सागरतटीय रोड एम.टी.एच.एल. ते आमरा मार्ग, एअरपोर्ट लिंक रोड नवी मुंबई, सिडको यांचा प्रस्ताव.. क्षेत्र 32.6921 हेक्टर

संदर्भ:-1) केंद्रशासनाकडील पत्र क्र. एफसी-II/एमएच-191/2022/ एनजीपी/ 10483, दि.19/10/2022.
2) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/२०/जमीन/वसं/३032, दिनांक ०८.१२.२०२२
3) प्रकल्प यंत्रणेचे पत्र क्र. सिडको/जीएम(फॉरेस्ट)/2022/1890, दिनांक ०५.११.२०२३
4) केंद्रशासनाकडील पत्र क्र. एफसी-II/एमएच-191/2022/एनजीपी/12721, दि.08/01/2024
5) प्रकल्प यंत्रणेचे पत्र क्र. सिडको/जीएम(फॉरेस्ट)/2024/2215, दिनांक 18.01.2024
6) मुख्य वनसंरक्षक ठाणे यांचेकडील पत्र क्र.कक्ष-10/वसं/प्र.क्र.04/22-२३/जा.क्र.५५१/ 23-24 दि.३०/०१/२०२४

वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत उलवा सागरतटीय रोड एम.टी.एच.एल. ते आमरा मार्ग, एअरपोर्ट लिंक रोड नवी मुंबई, सिडको यांचा प्रस्ताव क्षेत्र 32.6921 हेक्टर वन जमीन मागणीचा प्रस्तावास एकरेषिय (Linear) प्रकल्पांना तत्वतः मान्यता दिल्यानंतर प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरु करुन सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर तत्वतः मान्यता दिलेल्या पत्रांतील आवश्यक अटींची पुर्तता प्रकल्प यंत्रणेने केलेनंतर प्रकल्पांतर्गत वन जमिनीवरील झाडे तोडण्यास व कामे सुरु करण्यास परवानगी देण्याकरीता केंद्र शासनाचे दिनांक ०८/०८/२०१४ व दिनांक ०७/०५/२०१५ मधील निर्देशांनुसार राज्य शासनाचे दिनांक ०१/०७/२०१५ चे परिपत्रकान्वये अशी परवानगी देणेसाठी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांना प्राधिकृत केले आहे.

जनरल मॅनेजर (पर्यावरण व वने), सिडको भवन, सी.बी.डी.बेलापुर, नवी मुंबई उलवा सागरतटीय रोड एम.टी.एच.एल. ते आमरा मार्ग, एअरपोर्ट लिंक रोड नवी मुंबई, सिडको यांचा प्रस्ताव क्षेत्र 32.6921 हेक्टर वन जमीन मागणीचा प्रस्ताव प्रस्तावीत आहे.

तसेच मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांनी त्यांचेकडील संदर्भिय पत्र क्र. 6 मधील १ ते १3 अटींचे अधिन राहून प्रकल्पाचे मंजूर काम सुरु करणेस (Working Permission) व वृक्षतोडीस परवानगी दिलेली आहे. सोबत सदर आदेशाची प्रत जोडून पाठविली आहे.

तरी वन परिक्षेत्र अधिकारी, उरण यांनी मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडील आदेश क्र. 6 अन्वये परवानगी दिल्यानुसार प्रकल्प यंत्रणेस मंजूर आखणी मार्गात कामे सुरु करणेसाठी व वृक्ष तोडण्यास परवानगी देण्यांत यावी. तसेच केंद्रशासनाकडील आखणी मार्ग मंजुरीप्रमाणे वनक्षेत्रामध्ये जागेवर सिमांकन करुन कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

तसेच प्रकल्प यंत्रणेकडून कामे करताना सदर आदेशातील अटी/शर्तीचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची वन परिक्षेत्र अधिकारी, पनवेल यांनी दक्षता घ्यावी.

सहपत्रः- वरील प्रमाणे.

(राहुल पाटील, भा.व.से.)
उप वनसंरक्षक,
अलिबाग वनविभाग, अलिबाग.

प्रत, वन परिक्षेत्र अधिकारी, उरण.

प्रतिलिपीः- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपीः- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपीः- जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांचेकडे माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपीः- जनरल मॅनेजर (पर्यावरण व वने), सिडको भवन, सी.बी.डी.बेलापुर, नवी मुंबई यांना माहितीसाठी रवाना.

2/- त्यांनी मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांनी संदर्भिय पत्र क्र. 6 मधील अट क्रमांक 1 ते १3 अन्वये निर्देशीत केलेप्रमाणे कार्यवाही करुन पुर्तता अहवाल सादर करावा.

प्रतः- सहा. वनसंरक्षक, पनवेल यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.